मुंबई / पुणे / नागपूर / नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या तसेच कार्यक्षेत्रात येणाऱ्या नगरपालिका/ नगरपंचायती / महानगरपालिकांसाठी सार्वजनिक सुविधांचे सुयोग्य रितीने नियोजन करण्याकरिता व त्यासाठी उक्त नियोजन प्राधिकरणांच्या हद्दीबाहेर प्रादेशिक योजनेमध्ये (संबंधित महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये) विविध सार्वजनिक उपयोगितेची आरक्षणे प्रस्तावित करण्याच्या दृष्टीकोनातून सर्वकष असे धोरण तयार करुन ते शासनास सादर करण्याकरिता समितीचे गठण करण्याबाबत...

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण वि. मु.का., पुणे-१. आवक क्र. ....... 520
टिपीव्ही -१/२/३/४/५/६/७
0 8 APR 2025
कायासन मु.प्र./ सं न र./सं न र.

## महाराष्ट्र शासन

### नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२४/प्र.क्र.३७/२०२४/नवि-१३**

मुख्य इमारत, ४ था मजला, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि : ०४.०४.२०२५

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 77 दिनांक- 11.04.25
संबधित अधि./कर्म.
न.र. उ.स.न.र.

## आदेश

I. मुंबई / पुणे / नागपूर/ नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये अनेक महानगरपालिकांचा/नगरपालिकांचा /नगरपंचायतींचा समावेश असून सदर महानगरपालिकांचा विकास आराखडा तयार करतांना आवश्यक त्या सार्वजनिक सुविधांचे नियोजन करण्यासाठी शहरातील सोसायटी क्षेत्राची गरज लक्षात घेऊन शहरांमध्ये स्मशानभूमी / दफनभूमी, कत्तलखाना, अग्निशमन केंद्र, घनकचरा प्रक्रिया केंद्र, मलनिस्सारण: प्रक्रिया केंद्र, जलतरण तलाव या सारखी विविध उद्देशांसाठीची आरक्षणे प्रस्तावित करणे गरजेचे आहे.

II. सद्यस्थितीत नगरपालिका / महानगरपालिका / नगरपंचायती यांचे विकास योजनेमध्ये सार्वजनिक सुविधांकरिता शहराचे क्षेत्र व लोकसंख्या यांच्या प्रमाणात आरक्षणे प्रस्तावित करुन विकसित केले जातात. परंतु अशा परिस्थितीत एकाच प्रकारच्या सार्वजनिक सुविधेच्या आरक्षणाकरिता प्रत्येक शहरात स्वतंत्र आरक्षण प्रस्तावित करण्यात येते.

III. त्याचप्रमाणे मुंबई / पुणे / नागपूर/ नाशिक शहरे व त्या सभोवतालच्या विस्तृत क्षेत्राकरिता शासनाने महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे स्थापन केलेली आहेत. सदर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये अनेक नियोजन प्राधिकरणे (नगरपालिका / महानगरपालिका / नगरपंचायती) समाविष्ट आहेत. त्याचप्रमाणे सदर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे विकासाकरिता महानगर प्रदेश समिती स्थापन असून सदर समितीमार्फत महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्य क्षेत्रामध्ये विकासाची कामे केलेली जातात. त्यामुळे प्राधिकरणाच्या क्षेत्राचा एकसंघ स्वरुपात

नगर विकास विभाग

विकास होण्याकरिता महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्र व त्यामध्ये समाविष्ट असलेल्या नियोजन प्राधिकरणांकरिता एकत्रितपणे आवश्यक असलेल्या सार्वजनिक सुविधा पुरविणे गरजेचे आहे. सदर क्षेत्रामध्ये नागरिक हे या विस्तृत भागात राहतात. त्यांना कोणत्या कोणत्या नागरी सुविधा प्रादेशिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर एकत्रित वापरासाठी व मोठ्या क्षेत्रावर उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे ? याचा अभ्यास करणे, तसेच अशा सार्वजनिक सुविधा प्रस्तावित करण्याकामी व अशा सुविधांचे एकसंघ नियोजन होण्याच्या दृष्टीकोनातून सुयोग्य धोरण व मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे आवश्यक आहे.

IV. उक्त अनुक्रमांक (I ते III) मध्ये नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीमधील सर्व नगरपालिका / महानगरपालिका / नगरपंचायती मिळून सदरच्या सर्व नियोजन प्राधिकरणासाठी **प्रादेशिक योजना स्तरावर** (Zonal Level) ला एकाच ठिकाणी स्टेडियम, शहरस्तरावरील बगीचा, कत्तलखाना, अग्निशमन केंद्र, घनकचरा प्रक्रिया केंद्र, मलनिस्सारण: प्रक्रिया केंद्र, जलतरण तलाव यासारखी आवश्यक आरक्षणे एकत्रितरित्या व सुयोग्य ठिकाणी आरक्षणे प्रस्तावित केल्यास, उक्त आरक्षणांचा विकास व त्याची अंमलबजावणी तात्काळ होऊ शकेल. या दृष्टीने प्रादेशिक योजनेमध्ये सर्व नियोजन प्राधिकरणांनी मिळून सर्वांच्या एकत्रीत वापरासाठी एकाच ठिकाणी आवश्यक असे आरक्षणे प्रस्तावित करणे गरजेचे आहे, असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

V. त्याचप्रकारे, **महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायतींच्या यांच्या विकास योजनांमध्ये** (Local Level) वर आवश्यक स्वरुपाच्या सार्वजनिक सुविधा पुरवण्याच्या अनुषंगाने नियोजन प्राधिकरणाचे स्तरावरुन कर्तव्य म्हणून किंवा कायद्याने बंधनकारक असणाऱ्या आरक्षणांचा प्रकार, आरक्षणांकरिता आवश्यक क्षेत्र, तसेच स्वेच्छाधिकाराच्या अधिन देता येऊ शकणाऱ्या सोयी सुविधा व इतर बाबींच्या अनुषंगाने आवश्यक निकष व मार्गदर्शक तत्वे याबाबत देखील विचार होणे आवश्यक आहे.

VI. सबब, प्रस्तुत प्रकरणी सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून मुंबई / नाशिक / पुणे / नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या तसेच कार्यक्षेत्रात येणाऱ्या नगरपालिका/नगरपंचायती / महानगरपालिकांसाठी सार्वजनिक सुविधांचे सुयोग्य रितीने नियोजन करण्याकरिता व त्यासाठी उक्त नियोजन प्राधिकरणांच्या **हद्दीबाहेर प्रादेशिक योजनेमध्ये** (संबंधित महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये) व नियोजन प्राधिकरणाच्या **हद्दीमधील विकास योजनेमध्ये** विविध सार्वजनिक उपयोगितेची अत्यावश्यक आरक्षणे प्रस्तावित करण्याच्या दृष्टीकोनातून सर्वकष असे धोरण तयार करुन ते शासनास सादर करण्याकरिता मुंबई / पुणे / नागपूर महानगर प्रदेश महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आयुक्ताच्या समितीचे गठण करणे आवश्यक होते. त्यामुळे सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

नगर विकास विभाग,

०२. **शासन निर्णय :-**

मुंबई / पुणे / नागपूर/नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या तसेच कार्यक्षेत्रात येणाऱ्या नगरपालिका / महानगरपालिकांसाठी सार्वजनिक सुविधांचे सुयोग्य रितीने नियोजन करण्याकरिता व त्यासाठी उक्त नियोजन प्राधिकरणांच्या हद्दीबाहेर प्रादेशिक योजनेमध्ये (संबंधित महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये) विविध सार्वजनिक उपयोगितेची आरक्षणे प्रस्तावित करण्याच्या दृष्टीकोनातून सर्वकष असे धोरण तयार करुन ते शासनास सादर करण्याकरिता खालीलप्रमाणे समितीचे गठण करण्यात येत आहे.

i. **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)**

| | | |
|---|---|---|
| १. | महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | अध्यक्ष |
| २. | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेले अतिरिक्त आयुक्त, या दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| ३. | आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका | सदस्य |
| ४. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी म्हणून संचालक, नगर रचना तथा मुख्य नियोजक म.औ.वि.म.मुंबई | सदस्य |
| ५. | मुख्याधिकारी, सर्व संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत | सदस्य |
| ६. | सह व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, सिडको | सदस्य |
| ७. | सह संचालक, नगर रचना कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई | सदस्य सचिव |

ii. **पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA)**

| | | |
|---|---|---|
| १. | महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | अध्यक्ष |
| २. | आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका | सदस्य |
| ३. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी म्हणून संचालक, नगर रचना तथा मुख्य नियोजक म.औ.वि.म.मुंबई | सदस्य |
| ४. | मुख्याधिकारी, सर्व संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत | सदस्य |
| ५. | सह संचालक, नगर रचना पुणे विभाग, पुणे | सदस्य सचिव |

iii. **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA)**

| | | |
|---|---|---|
| १. | महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | अध्यक्ष |
| २. | आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका | सदस्य |
| ३. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी म्हणून संचालक, नगर रचना तथा मुख्य नियोजक म.औ.वि.म.मुंबई | सदस्य |
| ४. | मुख्याधिकारी, सर्व संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत | सदस्य |
| ५. | सह संचालक, नगर रचना नागपूर विभाग, नागपूर | सदस्य सचिव |

नगर विकास विभाग,

iv. **नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA)**

| | | |
|---|---|---|
| १. | महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | अध्यक्ष |
| २. | आयुक्त, नाशिक महानगरपालिका | सदस्य |
| ३. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी म्हणून संचालक, नगर रचना तथा मुख्य नियोजक म.औ.वि.म.मुंबई | सदस्य |
| ४. | मुख्याधिकारी, सर्व संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत | सदस्य |
| ५. | सह संचालक, नगर रचना नाशिक विभाग, नाशिक | सदस्य सचिव |

**०३. उपरोक्त गठीत समितीची कार्यकक्षा व कालबंध कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-**

i. उक्त समितीने महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या कार्यक्षेत्रातील सर्व नगरपालिका / महानगरपालिका / नगरपंचायती यासारख्या सर्व नियोजन प्राधिकरणांच्या गरजा विचारात घेऊन सदरच्या सर्व नियोजन प्राधिकरणासाठी प्रादेशिक योजना स्तरावर एकाच ठिकाणी स्टेडियम, शहरस्तरावरील बगीचा, कत्तलखाना, अग्निशमन केंद्र, घनकचरा प्रक्रिया केंद्र, मलनिस्सारण: प्रक्रिया केंद्र, जलतरण तलाव यासारखी आवश्यक सार्वजनिक सुविधेच्या स्वरुपातील आरक्षणे एकत्रित रित्या सुयोग्य ठिकाणी आरक्षणे प्रस्तावित करण्याच्या शक्यतेबाबत आवश्यक ते सर्वेक्षण करुन याबाबत समितीने पडताळणी करावी.

ii. सदर शासन नियुक्त समितीने, मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने आवश्यक पडताळणी नंतर प्रादेशिक योजनेमध्ये समाविष्ट असणाऱ्या महानगरपालिकां / नगरपालिकांकरिता/नगरपंचायती यांचेकरिता एकत्रितरीत्या सार्वजनिक उपयोगितेची आरक्षणे उपलब्ध व्हावीत या दृष्टीकोनातून उक्त नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्राबाहेर प्रादेशिक योजना स्तरावर **(Zonal Level)** स्टेडियम, शहरस्तरावरील बगीचा, कत्तलखाना, अग्निशमन केंद्र, घनकचरा प्रक्रिया केंद्र, मलनिस्सारण: प्रक्रिया केंद्र, जलतरण तलाव यांचेसह अन्य सार्वजनिक उपयोगितेच्या दृष्टीकोनातून कोणत्या स्वरुपाची सार्वजनिक सुविधेबाबतची आरक्षणे सर्व नियोजन प्राधिकरणांनी मिळून सर्वांच्या एकत्रीत वापरासाठी एकाच ठिकाणी आवश्यक प्रस्तावित करता येणे शक्य होईल ? याबाबत अभ्यास व पडताळणी करुन शासनास अहवाल सादर करण्यात यावा.

iii. सदर अहवालामध्ये प्रादेशिक योजना स्तरावर **(Zonal Level)** ठेवावयाची सार्वजनिक सुविधेच्या आरक्षणासाठी लागणारे क्षेत्र, आरक्षणाचे स्थानांकन, पोहच रस्ता रूंदी, इत्यादी बाबींची तपासणी करुन याबाबत आवश्यक निकष / मार्गदर्शक तत्वे शासनास प्रस्तावित करण्यात यावेत.

iv. त्याचप्रमाणे, महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायतींच्या यांच्या विकास **योजनांमध्ये (Local Level)** वर आवश्यक स्वरुपाच्या सार्वजनिक सुविधा पुरवण्याच्या अनुषंगाने नियोजन प्राधिकरणाचे स्तरावरुन कर्तव्य म्हणून किंवा कायद्याने बंधनकारक असणाऱ्या आरक्षणांचा प्रकार, आरक्षणांकरिता आवश्यक क्षेत्र, तसेच स्वेच्छाधिकाराच्या अधिन देता येऊ शकणाऱ्या सोयी सुविधा पुरवण्याच्या अनुषंगाने अशा अत्यावश्यक असलेल्या आरक्षणांचा प्रकार, आरक्षणांकरिता आवश्यक क्षेत्र, आरक्षणांचे स्थानांकन व इतर बाबींच्या अनुषंगाने आवश्यक निकष व मार्गदर्शक तत्वे शासनास प्रस्तावित करण्यात यावे.

नगर विकास विभाग,

v. सदर शासन नियुक्त समितीने सार्वजनिक सुविधांचा विकास करण्यासंबंधी कार्यपध्दती प्रस्तावित करुन त्याबाबत आवश्यक त्या शिफारशी तयार करुन त्याबाबतचा सर्वसमावेशक अहवाल शासनास सादर करण्यात यावा. तसेच या विषयाबाबत समितीचे अध्यक्ष यांचे निर्देशानुसार समितीच्या बैठकी आयोजित करणे व या अनुषंगिक कार्यवाही उक्त समितीचे सदस्य सचिव, यांनी करण्यात यावी.

vi. सदरहु समितीने सदर विषयाचे तज्ञ, शासनाच्या इतर विभागातील तसेच आवश्यकतेनुसार संबंधित महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीमधील संबंधित इतर नियोजन प्राधिकरणाशी समन्वय साधून आवश्यक ती माहिती द्यावयाची असून सदर समितीस संबंधितांनी आवश्यक ते सहकार्य करण्यात यावे. तसेच समितीने आवश्यकतेनुसार अशा तज्ञ / माहितीगार व्यक्ती / संस्था यांना बैठकीस बोलावून आवश्यक ती माहिती प्राप्त करून घेणे अनुज्ञेय राहील.

**०४. तज्ञ समितीचा कार्यकाळ.**

शासन निर्णयाचे दिनांकापासून समितीने वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन **२ महिन्यांचे** कालावधीत परिपूर्ण अहवाल शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा..

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/ नियम ) या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.*

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. सत्यमेव जयते

**(डॉ.प्रतिभा भदाणे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उप मुख्यमंत्री (वित्त) महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदया यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत कार्यवाहीसाठी:-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

-/सदरचा शासन निर्णय नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा तसेच सदर शासन निर्णयाची प्रत शासन नियुक्त समितीचे संबंधित सर्व अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव यांना संचालनालयाच्या स्तरावरून पाठविण्यात यावी.

२) विभागीय आयुक्त, पुणे / नाशिक / कोकण / नागपूर / छत्रपती संभाजीनगर /अमरावती महसूल विभाग.

३) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

४) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका.

५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी म्हणून संचालक, नगर रचना तथा मुख्य नियोजक म.औ.वि.म.मुंबई.

६) मुख्याधिकारी, सर्व संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत.

७) सह व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, सिडको.

८) सर्व विभागीय सह संचालक, नगर रचना , पुणे / नाशिक / कोकण / नागपूर / छत्रपती संभाजीनगर /अमरावती विभाग.

९) महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

१०) महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

११) सर्व जिल्हाधिकारी.

१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण. (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

१३) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

१४) सर्व नवनगर विकास प्राधिकरणे.

१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे.

१६) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.

१७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रामध्ये राज्यस्तरावर प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती नगर विकास विभागास संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना आणि वरील सर्व कार्यालयांना पाठवाव्यात.

१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

१९) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, सर्व शाखा कार्यालये.

२०) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषद.

२१) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सोबतचा शासन निर्णय या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

२२) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

२३) निवड नस्ती (नवि-१३)

********************

नगर विकास विभाग,
सत्यमेव जयते
मंत्रालय, मुंबई-32.